दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● बुधवार दि.८ ऑक्टोबर २०२५ 9422660067 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक ५१ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Wednesday 8 Oct 2025 9422660067 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 51 ● Pages 4 ● Rate 4 Rs

### उद्धव ठाकरेंनी काही वेगळे केले नाही

**मुंबई**–शेतकरी कर्जमाफीसंदर्भात बोलताना देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे सरकारच्या 'महात्मा ज्योतिराव फुले कर्जमाफी' योजनेचा उल्लेख केला. उद्धव ठाकरेंनी त्यावेळी २० हजार ५०० कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. मात्र, त्याच्या तीन वर्ष आधी आमच्या सरकारने मी मुख्यमंत्री असताना छत्रपती शिवाजी महाराज कर्जमाफी केली होती. त्यावेळी आम्हीही १८ हजार ७६२ कोटी आणि नंतर १ हजार ९०० कोटी अशी मिळून २० हजार ५०० कोटी रुपयांची कर्जमाफी केली होती. त्यामुळे उद्धव ठाकरेंनी काहीतरी वेगळे केले, असे नाही, असा टोला फडणवीस यांनी लगावला.

# बीड कारागृहात धर्मांतराचा घोटाळा?

## आमदार गोपीचंद पडळकर यांचा स्फोटक आरोप!

### सांगली बँक घोटाळ्याची ही चौकशीची मागणी

**या भेटीत पडळकर आणि सदाभाऊ खोत यांनी सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील आर्थिक घोटाळा, तसेच शेतकरी सहकारी सूतगिरणीतील गैर व्यवहारा बाबतही चौकशी करण्याची मागणी केली. त्यांनी सांगितले की, या सर्व चौकशा निवृत्त न्यायाधीश किंवा वरिष्ठ अधिकार्यांच्या माध्यमातून पार पाडाव्यात. सरकारने पारदर्शक तपास सुरू करावी.**

### सीसीटीव्ही तपासा–दोषींवर गुन्हा नोंदवा!

या प्रकरणाची सीसीटीव्ही फुटेजद्वारे सखोल चौकशी करून संबंधित कारागृह अधिकार्यावर गुन्हा नोंदवावा आणि त्याला तत्काळ बडतर्फ करावे, अशी मागणी आमदार पडळकर यांनी केली आहे. त्यांनी स्पष्ट इशारा दिला की, अशा प्रकारचे धार्मिक षड्यंत्र कारागृहाच्या चार भिंतींच्या आत होऊ देणार नाही. गरज पडल्यास आम्ही रस्त्यावर उतरू .

**दैनिक वादळ वार्ता**
**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्हा कारागृहातून एक धक्कादायक प्रकरण समोर आले आहे! भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी गंभीर आरोप करत सांगितले की, कारागृहात बंदीवानांचे जबरदस्तीने धर्मांतर करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कारागृहातील छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि श्री गणेश यांच्या मूर्ती व छायाचित्रे हटवून त्या ठिकाणी बायबलमधील पंक्ती लिहिण्यात आल्या आहेत. तसेच, कारागृहात चालणारे कीर्तन कार्यक्रम बंद करण्यात आले असून बंदीवानांना लाखो रुपयांचे आमिष दाखवून धर्मांतरासाठी प्रवृत्त केले जात आहे, असा स्फोटक दावा पडळकर यांनी केला आहे. आमदार पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांनी या संदर्भात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तत्काळ चौकशी आणि कारवाईची मागणी केली आहे.बीड कारागृहातील धर्मांतर प्रकरणामुळे प्रशासनात खळबळ उडाली असून, राज्य सरकारकडून तातडीने चौकशी सुरू होण्याची शक्यता आहे. नागरिक आणि विविध सामाजिक संघटनांकडून या प्रकरणावर तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.



### बंदीवानांवर धार्मिक दडपशाही–अधिकारीच धर्मांतर घडवत आहेत!

पडळकर म्हणाले की, बीडचे कारागृह अधिकारीच धर्मांतराचे काम करीत आहेत. एक ख्रिस्ती धर्मोपदेशक नियमित कारागृहात येतो आणि बंदीवानांना सांगतो – 'तुम्ही धर्मांतर करा, तुम्हाला लाखो रुपये देतो'. हे अत्यंत गंभीर आहे. हे वर्तन केवळ संविधानविरोधीच नाही तर राष्ट्रविरोधी आहे.ते पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज, श्री गणेश यांच्या मूर्ती काढल्या गेल्या आणि डॉ. आंबेडकर, महात्मा फुले यांच्या छायाचित्रांना कोपऱ्यात फेकण्यात आले! हे आपल्या संस्कृतीवरचा थेट अपमान आहे. आम्ही या प्रकरणाचा शेवटपर्यंत पाठपुरावा करू.

# आगामी निवडणुकांत काँग्रेस पुर्ण ताकतीने उतरणार–अहमद चाऊस

## परळीत काँग्रेसच्या बैठकीत पदाधिकार्यांचा निर्धार

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी | प्रतिनिधी**

आगामी जिल्हा परिषद,पंचायत समिती व नगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पुर्ण ताकदीने उतरणार असुन सर्वच गट व गणांमध्ये सक्षम उमेदवार उतरवणार आहे.महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या पाठिशी काँग्रेस आपली ताकद लावणार असल्याचे काँग्रेसचे परळी विधानसभा प्रभारी अहमद चाऊस यांनी सांगितले.



परळी शहर व तालुका काँग्रेसची आढावा बैठक पार पडली. परळी विधानसभा प्रभारी अहमद चाऊस औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर यांच्या उपस्थितीत दि.३ ऑक्टोबर रोजी परळी येथील नवीन शासकीय विश्राम गृह शिवाजी चौक येथे दुपारी ३ वाजता पार पडली.या बैठकीत अंबाजोगाई शहर काँग्रेस अध्यक्ष,त्यांचे सहकारी सय्यद अतिक भाई,परळी तालुका अध्यक्ष प्रकाश मुंडे,परळी शहराध्यक्ष सय्यद हनिफ उर्फ बहादूरभाई,ओबिसी महाराष्ट्र उपाध्यक्ष वसंत मुंडे,महाराष्ट्र प्रदेश माजी सरचिटणीस अनिल मुंडे,माजी शहर अध्यक्ष प्रकाश देशमुख आदी पदाधिकार्यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अनेक कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.चाऊस यांनी आगामी सर्व निवडणुकांसाठी कार्यकर्त्यांनी तयारी करावी काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीनिशी पाठीशी उमेदवारांच्या पाठिशी उभा राहणार असल्याचे सांगितले.

# अक्कलकुवा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी भावना गोसावी

**दैनिक वादळ वार्ता**
**खापर | तुकाराम क्षीरसागर**



अक्कलकुवा कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी प्रा.भावना गोसावी तर सचिव पदी प्रा. गणेश जगदाळे यांची एक मताने निवड करण्यात आली. नुकतीच नुकतीच अक्कलकुला तालुका कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली. या सभेचे अध्यक्षस्थानी मा. तालुका उपाध्यक्ष प्रा. सुदेश सूर्यवंशी होते.या सभेत सुरवंशी यांनी संघटना व संघटना विषयी माहिती दिली संघटना का गरजेचे आहे याचे महत्त्व सांगितले आपल्या कार्यकारणीची मुदत संपली असल्यामुळे महासंघाच्या आदेशान्वये नवीन कार्यकारणी गठीण करणे गरजेचे आहे कार्यकारणी खालील प्रमाणे प्रा. बी. यु. गोसावी (ता. अध्यक्ष ) प्रा. गणेश जगदाळे (सचिव) प्रा. अजब सिंग पाडवी ( तालुका उपाध्यक्ष) प्रा. प्रवीण चौधरी ( सहसचिव ) प्रा. अनिता चौधरी ( महिला प्रतिनिधी )

जिल्हा कार्यकारणी सदस्य प्रा. सुदेश सूर्यवंशी, प्रा. संदीप भावसार कार्यक्रमासाठी नूतन तालुका अध्यक्ष प्रा. भावना गोसावी यांनी सर्वांचे अभिनंदन करून सर्व एकजुटीने संघटनेचे काम करू यासाठी सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे असा माणस व्यक्त केला . अक्कलकुवा तालुक्यात प्रथमच महिला तालुका अध्यक्ष होण्याचा सन्मान प्रा. भावना गोसावी यांना मिळाल्याने सर्व स्तरातून कौतुक होत आहे व अभिनंदन करण्यात येत आहे.

# सोमावलमध्ये डॉ.जयंत नारळीकर गणित व विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार | दिपक गोसावी**

विद्यार्थ्यांचे गणित आणि विज्ञान विषयातील आकलन वाढवण्यासाठी महत्त्वाकांक्षी असलेल्या डॉ. जयंत नारळीकर गणित आणि विज्ञान अध्ययन समृद्धी कार्यक्रमांतर्गत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद दि. ७ सप्टेंबर २०२५ रोजी दुधाबाई पाडवी माध्यमिक विद्यालय, सोमावल येथे यशस्वीरित्या पार पडली.सोमावल केंद्राच्या १४ शाळांमधील शिक्षक-शिक्षिका या परिषदेत सहभागी झाले होते.या शिक्षण परिषदेचे उद्घाटन केंद्रप्रमुख कांतीलाल पाडवी, मुख्याध्यापक भास्कर मराठे, पर्यवेक्षक विलास बैसाणे, तज्ञ मार्गदर्शक डॉ. दिपक शेंडे आणि जी.प. शाळेचे



मुख्याध्यापक जितेंद्र बोरसे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. शिक्षकांना 'खान अकॅडमी' पोर्टलचे सखोल मार्गदर्शन या परिषदेचा मुख्य उद्देश इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे गणित व विज्ञान विषयातील आकलन वाढवणे हा आहे. यासाठी, तज्ञ मार्गदर्शक डॉ. दिपक शेंडे यांनी कार्यक्रमाची ओळख, २०२५-२६ ची उद्दिष्ट्ये, आणि विशेषतः 'खान अकॅडमी' पोर्टलच्या प्रभावी वापराबाबत सखोल मार्गदर्शन केले.त्यांनी खान अकॅडमीवर नोंदणी प्रक्रिया, मास्टरी लर्निंग आणि सक्रियकरण या संकल्पना स्पष्ट करून, त्यावर आधारित उपयुक्त प्रात्यक्षिके सादर केली. शिक्षकांनी आपल्या वर्गात तंत्रज्ञानाचा वापर करून अध्ययन-अध्यापन प्रक्रिया कशी समृद्ध करावी, यावर डॉ. शेंडे यांनी विशेष भर दिला.याप्रसंगी सोमावल केंद्रात नवीन बदली होऊन आलेल्या शिक्षकांचा सत्कार व स्वागत करण्यात आले. प्रशिक्षणाविषयी अनिल करांडे, सुरक्षा वसावे, गणेश पाडवी यांनी आपले मनोगत व्यक्त केले आणि या मार्गदर्शनाबद्दल समाधान व्यक्त केले.तुषार वळवी यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सोमावल शाळेचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. राष्ट्रीय गीत घेऊन या महत्त्वपूर्ण शिक्षण परिषदेची सांगता करण्यात आली.

# बेवड्या ज्ञानेश्वरने रामचंद्रा चा कानच तोडला

**दैनिक वादळ वार्ता**
**केज | गौतम बचुटे**

की तालुक्यात युसुफ वडगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कौडगाव येथे एका मद्य प्राशन करून नशील्या पदार्थाच्या अंमलाखाली असलेल्या बेवड्याने एकाच्या कानाला चावा घेऊन त्याचा कानाचा लचका तोडल्याचा घटना घडली आहे.केज तालुक्यातील कौडगाव येथील रामचंद्र उध्दव वाळके हे दि. ६ ऑक्टोबर रोजी मी सध्याकाळी ६.३० वा. सुमारास गावातील दुध डेअरी समोर उभे असताना ज्ञानेश्वर पाडुरंग पवार हा दारू पिऊन मोठमोठ्याने बडबड करीत त्यांच्याकडे आला आणि त्यांच्या रामचंद्र वाळके यांच्या डाव्या कानाला चावा घेवून कानाचा अर्धा तूकडा तोडुन घेवून जखमी केले.



दि. ७ रोजी रामचंद्र वाळके यांनी दिलेल्या तक्रारी वरून ज्ञानेश्वर पवार यांच्या विरुद्ध युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गु. र. नं. २५९/२०२५ भा. न्या. सं. ११७(२), ११७(३), ११७(४), ३५१(२), ३५२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सहाय्यक पोलिस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हे हवालदार नवनाथ वारे हे तपास करीत आहेत.

# बांधाच्या रस्त्यावरून मारामारी : भांडणात महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावून घेतली

**दैनिक वादळ वार्ता**
**केज | गौतम बचुटे**

शेतातील नंबर बांधाच्या रस्त्याच्या कारणा वरून झालेल्या भांडणात एकाने महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावून घेतली आहे.केज तालुक्यातील लव्हुरी येथील संदिप अच्युत चाळक दि. ६ ऑक्टोबर रोजी रात्री ८:०० वा. सुमारास घरा समोर उभे असतांना ऋषीकेश वसंत चाळक सोबत कृष्णा शिवाजी चाळक, मुन्ना महादेव चाळक, प्रकाश रामभाऊ चाळक हे सर्वे नं १९० व १९१ मधील नंबर बांधाच्या रस्त्या वरुन पिकअप घेवुन जात असतांना म्हणाले की, हा कोणाच्या बापाचा रस्ता नाही ? असे म्हणुन निघुन गेला. त्या नंतर संदीप चाळक यांनी त्याचे वडिल वसंत सखाराम चाळक यास फोन करुन ही माहिती दिली आणि त्याला समजावुन सांगा असे सांगीतले. त्या नंतर ऋषीकेश चाळक, कृष्णा शिवाजी चाळक, मुन्ना महादेव चाळक, प्रकाश रामभाऊ चाळक



हे मोटारसायकली वरून संदीप चाळक यांच्या घराकडे गेले. त्यांनी त्यांच्या वडीलांना फोन का करुन सांगीतलेस ? असे म्हणून लाथाबुक्याने मारहाण केली. त्यावेळी संदीप चाळक यांची आई भांडण सोडवत असताना ऋषीकेशने आईला त्यांना पोटात कमरेत लाथ मारून शिवीगाळ करुन जिव मारण्याच्या धमक्या दिल्या.

या भांडणात ऋषीकेश चाळक याने संदीप चाळक यांच्या आईच्या गळ्यातील सोन्याची पोत हिसकावुन घेवुन गेला.संदीप चाळक यांच्या तक्रारी वरून ऋषीकेश चाळक, कृष्णा चाळक, महादेव चाळक आणि प्रकाश चाळक (सर्व रा. लव्हुरी ता केज) यांच्या विरुद्ध केज.पोलिस ठाण्यात. गु. र. नं. ५५१/२०२५ भा. न्या. सं. ११५(२), ११९(१), ३५१(२), ३५१(३), ३५२, ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अशोक सोनवणे हे तपास करीत आहेत.

संपादकीय

# अजाणांच्या ओठी

भारतात सर्वात जास्त दुर्लक्ष केले जात असेल तर ते मुलांच्या आरोग्याकडे. त्यातही सरकारी संस्था असतील तर या दुर्लक्षाचे परिणाम फारच भयंकर होतात. देशात एकूणच आरोग्यावर सरकार केवळ वित्त वर्ष २०२६ च्या अर्थसंकल्पानुसार २ टक्के खर्च करते. ही आकडेवारी केवळ २०२६ ची आहे. त्यापूर्वी कितीतरी लोकांनी सरकारच्या आरोग्यावरील अपुऱ्या उपाययोजनेमुळे आपले प्राण गमावले असतील त्याची कल्पना करणे अशक्य आहे. पण काल मध्य प्रदेशमध्ये ९ आणि राजस्थानात २ जणांचा बळी याच कफ सिरपमुळे गेला आणि त्यानंतर सरकारी यंत्रणा खडबडून जागी झाली. मग कोल्ड्रिफ या कफ सिरपवर बंदी आणली गेली आणि हे विषारी किंवा कंटॅमिनेटेड कफ सिरपचे जाळे केवळ मध्य प्रदेश अथवा राजस्थानमध्येच नव्हते, तर त्याची व्याप्ती तामिळनाडूतही पसरली आहे असे लक्षात आले. या कोल्ड्रिफमध्ये डाय इथिलीन ग्लायकोल हा विषारी पदार्थ अत्यंत धोकादायक अवस्थेत आढळला. ज्याचे प्रमाण ४८.६ टक्के इतके होते. सहसा कोणत्याही कफ सिरपमध्ये या घातक पदार्थाचे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेकडून केवळ ०.१० टक्के इतके असण्यास मान्यता आहे. इतक्या जास्त प्रमाणात या पदार्थाची कफ सिरपमध्ये उपस्थिती ही त्याच्या घातकपणाची साक्ष आहे पण ते औषध देणाऱ्या डॉक्टर्सची कंपन्यांशी असलेली साठगाठ दाखवून देणारी आहे. आता केंद्र सरकार आणि मध्य प्रदेश सरकारने डॉक्टरांसाठी सल्लापत्र जारी केले आहे, की त्यांनी दोन वर्षांखालील मुलांसाठी तरी हे कफ सिरप आपल्या औषध योजनेत देऊ नये. पण हे उशिरा आलेले शहाणपण झाले. त्या आधी जी अकरा बालके दगावली त्यांच्या जिवांची कोण जबाबदारी घेणार हा प्रश्न तसाच आहे.जी मुले या प्रकरणात दगावली आहे, ती गरीब किंवा मध्यमवर्गीय परिवारांतील आहे. त्यांच्या आईवडिलांकडे यंत्रणेला जाब विचारण्याची क्षमता नाही. त्यामुळे या असहाय्य आईवडिलांनी आपल्या मुलांच्या यमदूताकडे म्हणजे डॉक्टरांच्या कृत्यांकडे असहाय्यपणे पाहत बसावे का, असा प्रश्न उरतो. औषध तयार करणाऱ्यांनी आपल्या नैतिकतेशी तडजोड करत ही विषारी द्रव्य असलेली कफ सिरप विकली आहे. यंत्रणेविरोधात दाद मागण्याची सामान्य माणसात ताकद नसतेच त्यामुळे हे प्रकार चालतात. काही दिवस हे गाजेल आणि नंतर बासनात गुडांळून ठेवले जाईल. कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण असल्याची पुष्टी केली आहे. पण तामिळनाडूमधील उत्पादक कंपनीला इतक्या प्रमाणात हा विषारी पदार्थ वापरण्याची परवानगी कुणी व का दिली हा यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील सहा आणि राजस्थानातील दोन बालके या कफ सिरपमुळे दगावली. याला सरकारी यंत्रणा जबाबदार आहे, यात काही शंका नाही. भाजपची सरकारे असलेल्या राज्यात हे प्रकार झाल्याने तेथील यंत्रणा दोषी आहे, असा दावा कुणी केला तर त्यासारखे हास्यास्पद तोच असेल. पण या प्रकरणाची निष्पक्षपाती चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. आरोग्य मंत्रालयानेही पुष्टी केली आहे, की त्यांच्या तामिळनाडूमध्ये असलेल्या कोल्ड्रिफ या कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दोन वर्षांच्या आतील बालके या औषधामुळे दगावली आहे. पण केंद्र सरकारच्या चाचणीत असे आढळले आहे, की कोणतेही दूषित पदार्थ कफ सिरपमध्ये आढळला नाही. सीडीसीएसओने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे, की कोणत्याही कफ सिरपमध्ये असा कोणताही दूषित पदार्थ आढळला नाही. असे असले तरीही या ११ मुलांच्या मृत्यूची जबाबदारी कोणत्याही सरकारला टाळता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपला क्लीन चिट दिले असले, तरीही त्यामुळे लहान मुलांचे मृत्यू झाले हे सत्य नाकारता येणारे नाही. केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशांना कफ सिरपचा वापर करू नये म्हणून कडक आदेश दिले. राज्यांनी या विषयावर जी सतर्कता दाखवली आहे ती कौतुकास्पद आहे. कफ सिरपच्या उत्पादनावर हिमाचलमध्ये बंदी आणली आहे आणि तामिळनाडूत तर बंदी आहे. आपल्याकडे कफ सिरप अगोदर निरूपद्रवी औषध म्हणून उपयोगात आणले जात होते पण त्यानंतर झोपडपट्टीतील मुलांनी आणि कित्येक तरुणांनीही कफ सिरपचा मादक पदार्थ म्हणून वापर सुरू केला होता. त्यामुळेच त्याच्यावर आधीच बंदी होती.सहा राज्यांत या कफ सिरपचे निरीक्षण करण्यात आले आणि त्यात दूषित पदार्थाचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त आढळले आहे. कफ सिरप हे फक्त खोकल्यावर दिले जाते आणि त्याचा उपयोग पुढे तरुणांकडून नशेसाठी केला जाऊ लागला. पण आता तर हे लहान मुलांचे बळी घेणारे ठरले आहे आणि ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे सरकारने जागरूक होऊन कफ सिरपच्या वापरावरच बंदी आणली आहे. कफ सिरपच्या वापरामुळे लोकांना विशेषतः बालकांना उच्च रक्तदाब, अनियमित हृदयाचे ठोके आणि मानसिक तसेच अस्वस्थ वाटणे असे परिणाम संभवतात. लहान बालके हे सांगू शकत नाही. त्यामुळे कित्येक तर मृत्यूला कवटाळतात. कधी-कधी या निरूपद्रवी वाटणाऱ्या कफ सिरपचे परिणाम भयंकर ठरतात. त्यामुळे आता सरकारने जी कृती केली आहे ती अत्यंत स्वीकारार्ह आणि योग्य आहे. तसेच कोरड्या खोकल्यासाठी कफ सिरप डॉक्टर लिहून देत असत. पण आता केंद्र सरकारने जारी केलेल्या सल्लापत्रामुळे तसे होणार नाही आणि यापुढे तरी बालके सुरक्षित राहतील अशी आशा बाळगण्यास जागा आहे. अन्न आणि औषध प्रशासन यांनी १८ किंवा त्यापेक्षा लहान मुलांसाठी कफ सिरप सुरक्षित नाही असे लिहून दिले आहे. पण तरीही आपल्याकडे नशा किंवा अन्य कारणांसाठी हे कफ सिरपचे सेवन केले जाते. आता या कफ सिरपवर कडक बंदी आणली पाहिजे. लहान मुले जी गेली आहे त्यांच्या आत्म्यांचा तळतळाट त्यामुळे आता तरी लागणार नाही. छिंदवाडातील मृत बालकांच्या मृत्यूंची संख्या १२ वर पोहोचली असताना कोल्ड्रिफचे बळी ते असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आता कोल्ड्रिफवर बंदी आली आहे, पण त्यांच्या शरिरांत विषारी पदार्थ असल्याचे आढळले आहे. ही निश्चितच भारताच्या आरोग्य क्षेत्रासाठी स्पृहणीय बाब नाही.

# विश्व निवेशक सप्ताह निमित्त एन.एस.ई.मार्फत योगेश्वरी तंत्र निकेतन महाविद्यालयात गुंतवणूकदार जागृती कार्यक्रम संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

वद्यार्थ्यांच्या आर्थिक साक्षरतेसाठी विश्व निवेशक सप्ताह निमित्त कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी तंत्रनिकेतन महाविद्यालय महाविद्यालयात उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थी सुशिक्षित होतात मात्र प्रत्येक विद्यार्थी आर्थिक साक्षर असेलच असे नाही आर्थिक साक्षरता होणे काळाची गरज आहे,आपला पैसा कुठे व कसा गुंतवायचा, पैसे कसे कमवायचे, आलेल्या पैशाचे नियोजन कसे करायचे याचे ज्ञान विद्यार्थी दशेत मिळाले तर भविष्यामध्ये तो विद्यार्थी कधीच आर्थिकअडचणीत येणार नाही,यासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. चंद्रशेखर बर्दापूरकर, उपाध्यक्ष श्री.गणपत व्यास,का.उपाध्यक्ष ड जगदीश चौसाळकर, सचिव श्री.कमलाकरराव चौसाळकर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. योगेश्वरी पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड




(सेबी) व नॅशनल स्टॉक एक्सचेंज (एन एस इ) अंतर्गत योगेश्वरी पॉलिटेक्निक आंबेजोगाई येथे पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांसाठी विश्व निवेशक सप्ताहाचे औचित्य साधून एक दिवशीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रम घेण्यात आला.अलीकडे तरुण वर्गांमध्ये आर्थिक साक्षरता व आर्थिक नियोजनाचा अभाव जाणून येतो.तरुणांचा कल दिवसेंदिवस चैनी वस्तू,मौजमजा,बर्थडे पार्टी अशा गोष्टींकडे होत चालला आहे तसेच फसवणूक करणाऱ्या योजना ज्यामध्ये कमी वेळेत अधिक परतावा देण्याचे अमिष दाखवून विद्यार्थ्यांची व सर्व सामान्यांची फसवणूक करताना आपणास पाहायला भेटत आहेत. यामुळे भविष्यात येणाऱ्या शैक्षणिक तसेच आर्थिक अडचणींना त्यांना सामोरे जावे लागते म्हणून विद्यार्थी दशेमध्ये योग्य ती आर्थिक नियोजन त्यांनी केले तर भविष्यातील येणाऱ्या आर्थिक संकट ते निश्चितपणे टाळू शकतात व आर्थिक दृष्ट्या ते श्रीमंत आणि समृद्ध नागरिक बनू शकतात,यासाठीच सेबी तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज एन एस इ चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी यांनी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.या कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना बचत व गुंतवणूक याचे महत्त्व व फरक समजावून सांगितला.बँक व पोस्ट ऑफिस मध्ये असलेल्या बचतीच्या विविध योजना समजावून सांगितल्या, आर्थिक नियोजनाचे सात टप्पे समजावून सांगितले तसेच कॅपिटल मार्केट काय असते? म्युच्युअल फंड व त्याचे वेगवेगळे फायदे,इत्यादी बद्दल सखोल अशी मार्गदर्शन करून सेबीची वेब साईड व टोल फ्री नंबर देऊन भविष्यात फसव्या योजनांपासून सजग राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी कॉलेज चे विभाग प्रमुख प्रा.आर. पी.कदम सर व प्रा.ए.एच. फड सर यांनी प्रयत्न केले तसेच सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्राध्यापक प्रकाश घुंबरे सर यांनी केले .या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज येथील सह दुय्यम निबंधक कार्यालय बनले दलालाचा अड्डा

## दस्त नोंदणीसाठी घेतले जातात हजारो रुपये, गरीब जनतेला लुबाडणाऱ्यांचा बंदोबस्त करावा नागरीकांची मागणी

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील सह दुय्यम कार्यालयात दलालांचा सुळसुळाट झाला असुन दस्त नोंदणीसाठी गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्यांचा सपाटा चालु असुन गोरगरीब जनतेला लुबाडणाऱ्या दलालांचा व संबंधित कर्मचारी यांचा बंदोबस्त करुन सर्व सामान्य जनतेला न्याय मिळावा अशी मागणी पक्षकारांकडुन केली जात आहे.याबाबत सविस्तर बातमी अशी की,शेत जमिनी अथवा घर जागा खरेदी विक्री करण्यासाठी शासनाने निर्धारित केलेले मुल्यांकन भरुन शासन नियमानुसार विविध कागदपत्रांची पूर्तता करुन दस्त नोंदणीसाठी प्रक्रिया केली जाते.शासन निर्णया प्रमाणे नियमानुसार पुर्ण फिस भरणा करुनही दस्त नोंदणीसाठी हजारो रुपये दलालांच्या मध्यस्थीने कर्मचारी घेत आहेत. शासनाचा पगार असताना सुद्धा सर्व सामान्य जनते कडुन अतिरिक्त पैशाची मागणी केली जात आहे. मुल्यांकन काढुन दिले जात असताना ही डील केली जाते व व्यवहार पुर्ण झाल्यानंतर हा व्यवहार केला जातो.ही प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडली जाते.भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी घोषणा केली होती की, न खाउंगा न गाने दुंगा परंतु या घोषणेला हरताळ फासला जात असुन आमचे कोणीही काहीच करु शकत नाही अशा आविर्भावात दलाल व कर्मचारी वावरत आहेत तरी यांच्या व नातेवाईक यांच्या मालमत्तेची चौकशी करून आर्थिक व्यवहार तपासणी व्हावी अशी मागणी केली जात आहे.




# सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपातून आरोपीची सुटका,केज जिल्हा अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

सरकारी कामात अडथळा आणल्याच्या आरोपातून आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात केल्याचा निर्णय केज जिल्हा व सत्र न्यायालयाने दिला आहे.



ही सुनावणी जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्रीमती आर.के.शेख यांच्या न्यायालयात झाली.प्रकरण क्रमांक ड.उ.छे.३१/२०२४ अंतर्गत आरोपीवर भारतीय दंड संहिता कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.सरकारी पक्षाने दिलेल्या पुराव्यावर बचाव पक्षाचे वकील ॲड.डी. एम.काजगुंडे यांनी केलेला प्रभावी उलट तपास व युक्तिवाद न्यायालयाने ग्राह्य धरत आरोपी निर्दोष ठरविला. याप्रकरणात ॲड.बी. आय.चौधरी,ॲड.अक्षय इंगळे व ॲड.अनिल राठोड यांनी सहकार्य केले.या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी की, फिर्यादी संगिता दिनकर कांबळे वय ४५ रा.धारूर व्यवसाय बस वाहक, धारूर आगार यांनी पोलीस स्टेशन धारूर येथे दिलेल्या तक्रारीनुसार,दि. २६ ऑगस्ट २०२३ रोजी अंबाजोगाई बसस्थानका वरून परतताना एका प्रवासी महिलेने तिच्याशी वाद घालत मारहाण केली व शिवीगाळ केली होती. या घटनेनंतर आरोपीवर कलम ३५३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.सर्व पुरावे व दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून न्यायालयाने आरोपी विरुद्ध पुरेसा पुरावा नसल्याचे नमूद करत निर्दोष मुक्तता केली आहे.

# रमण (बापूजी) चौधरी यांना जीवन गौरव सन्मान पुरस्कार



**दैनिक वादळ वार्ता**
**बोरद । मंगेश पाटील**

धुळे येथील लेवा पाटीदार गुजर सामाजिक संस्थेतर्फे नाशिकचे ज्येष्ठ समाजसेवी रमण हरी चौधरी (बापूजी) यांना जीवन गौरव सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

राष्ट्रपती पदक विजेते चौधरी यांनी शासकीय सेवेत बारडोली, सुरत, नवसारी, अहमदनगर इत्यादी ठिकाणी उल्लेखनीय कार्य केले आहे. त्यांनी भीमा नदी दुर्घटनेत तीन जीव वाचवून जीवन रक्षा पदक प्राप्त केले. सेवानिवृत्तीनंतरही ते सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात सक्रिय असून गुणवंत विद्यार्थी पुरस्कार उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देतात.या सन्मान प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष दशरथ पाटील, कार्याध्यक्ष प्रकाश पाटील, संस्थापक अध्यक्ष शरद बापू चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. रमण चौधरी यांच्या कार्याचा गौरव झाल्याबद्दल पुत्र दिलीप चौधरी यांनी आनंद व्यक्त केला.

# बोरगाव(बु) येथे अतिवृष्टी व पुरग्रस्त शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर विकास शिंदे यांचे १४ ऑक्टोबरपासून आंदोलनाचा इशारा

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

मौज बोरगाव(बु) ता.केज जि.बीड येथील शेतकरी विकास नवनाथ शिंदे यांनी अतिवृष्टी आणि महापुरामुळे झालेल्या शेती व पिकाच्या प्रचंड नुकसानीबाबत शासना कडे तात्काळ मदतीची मागणी केली असून, मागण्या न मानल्यास मंगळवार दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी हनुमान मंदिर,बोरगाव (बु) येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.शिंदे यांनी तहसिलदार केज यांच्या कडे सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे की,यंदाच्या अतिवृष्टी व मांजरा नदीच्या पुरामुळे त्यांच्या तसेच गावातील शेतकऱ्यांच्या सोयाबीन पिकाचे पूर्णपणे नुकसान झाले



आहे.नदीकाठची जमीन मातीसह खरडून गेल्याने रब्बी हंगामाची पेरणी करणेही अशक्य झाले आहे.शेतकऱ्यांच्या मुख्य मागण्या पुढील प्रमाणे आहेत.अतिवृष्टी व महापुरामुळे खरडून गेलेल्या शेती जमिनीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी.बाधित शेतकऱ्यांचे पिककर्ज माफ करण्यात यावे. विहिरी,सोलार पंप,तुषार सिंचन संच यांच्या नुकसानीचे पंचनामे करून मदत द्यावी.थकबाकीमुळे होल्ड केलेली बँक खाती महाराष्ट्र ग्रामीण बँक चिंचोली माळी तात्काळ रिलीज करावीत.घरकुल व मनरेगा मजुरांचे हप्ते तात्काळ वितरित करण्यात यावेत तसेच पैशाची मागणी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी.या निवेदनाची प्रत उप मुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड जिल्हा अजितदादा पवार, आमदार नमिताताई मुंदडा व जिल्हाधिकारी बीड यांना पाठविण्यात आले आहे.शेतकऱ्यांच्या समस्या न सोडविल्यास बोरगाव (बु) येथील शेतकरी वर्ग एकत्र येऊन तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# करुणा सेवा ट्रस्टने दिला पूरग्रस्त भागातील कुटुंबाला मदतीचा हात

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

मागील महिन्यापासून मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाला त्यामुळे मराठवाड्यातील जन जीवन विस्कळीत झाले होते.पुराच्या पाण्याने शेती पिकांचे मोठे नुकसान झाले तर अनेकांच्या घरात पाणी शिरल्यामुळे नागरिक हतबल झाले होते त्यांना मदतीचा हात म्हणून मुंबई येथील करुणा सेवा ट्रस्ट यांच्या संकल्पनेतून उदय चांदाराना यांच्या सहकार्याने बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त नागरिकांना मदतीचा हात देत जीवनावश्यक वस्तू व किराणा मालाचे वाटप करण्यात आले.

संकटात सापडलेल्या पूरग्रस्त भागातील कुटुंबांना आधार देण्याचे समाजभान राखत मुंबई येथील युवा उद्योजक प्रशांत भैय्या गाडे यांच्या माध्यमातून बीड धाराशिव जिल्ह्यातील पूरग्रस्त भागात ब्लँकेट,चादरी, अन्न धान्य,तेल,बिस्किटे, फरसाण,चटणी,व अन्य गृहउपयोगी वस्तू,औषधे, खाद्य पदार्थ वाटप करण्यात आले.यावेळी शिवप्रसाद ठोंबरे, अभिषेक भिसे,राहुल ठोंबरे,बप्पा भिसे,प्रदीप ठोंबरे,पोपट लांडगे, राजाभाऊ इटकर,शेळके अण्णा,आकाश भैय्या फरके,मारुती नवगण, पत्रकार दत्तात्रय मुजमुले यांच्यासह मित्र परिवार उपस्थित होता.



## ७० लाख एकर नुकसान, तरीही मदतीचा प्रस्ताव नाही

# मुख्यमंत्री दिल्लीला गेले, गृहमंत्री आले...पण मदत नाही, शरद पवारांचे सरकारवर टीकास्त्र

**दैनिक वादळ वार्ता**
**पुणे (वृत्तसंस्था)**

राज्यात अतिवृष्टी आणि पुरामुळे शेतकरी उद्ध्वस्त झाला असताना, केंद्राकडून अद्याप मदत जाहीर न झाल्याने ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी एक मोठा दावा केला आहे. केंद्राकडे मदतीसाठी संपर्क साधला असता, महाराष्ट्र सरकारकडून नुकसानीचा अंतिम प्रस्ताव अद्याप आलेलाच नाही, असे मला सांगण्यात आले, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने प्रस्ताव पाठवून शेतकऱ्यांसाठी मदत मिळवावी, अशी मागणीही त्यांनी केली.

शरद पवार म्हणाले की, मुख्यमंत्री दिल्लीला जाऊन आले, केंद्रीय गृहमंत्री राज्यात दौऱ्यावर आहेत, पण मदत जाहीर होत नाही. मी केंद्राशी बोललो असता, त्यांनी राज्याचा अंतिम प्रस्तावच आला नसल्याचे सांगितले. त्यामुळे राज्य सरकारने यात दिरंगाई न करता लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावा. सप्टेंबर महिन्यात विदर्भ, मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. कृषी मंत्र्यांच्या माहितीनुसार, राज्यात सुमारे ७० लाख एकर वरील पिकांचे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी जमिनी खरवडून गेल्या, घरे पडली आणि पशुधनाचे ही मोठे नुकसान झाले. शेतकरी एकरी ५० हजार रुपयांच्या मदतीची मागणी करत असताना, सरकारच्या पातळीवर मदतीचे घोडे अडल्याने नाराजी वाढत आहे.शरद पवार यांनी ऊस उत्पादकांकडून मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी रक्कम घेण्याच्या निर्णयावर तीव्र आक्षेप घेतला. ते म्हणाले, शेतकरी स्वतः मदतीच्या प्रतीक्षेत असताना, त्यांच्याकडूनच सक्तीने वसुली करणे अत्यंत चुकीचे आहे. आम्ही याविषयी मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालून या निर्णयाचा फेरविचार करण्याची विनंती करणार आहोत. साखर कारखान्यांच्या बैठकीत याविषयी चर्चा करून राज्य आणि केंद्राशी संवाद साधला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.शरद पवार म्हणाले की, राज्यातील शेतकरी आज अतिशय बिकट परिस्थितीत आहे आणि त्याला आधार देणे हे सरकारचे नैतिक कर्तव्य आहे. सरकार पिकांच्या नुकसानीची भरपाई देऊन आर्थिक मदत करू शकेल, पण ज्या शेतकऱ्यांच्या जमिनीच वाहून गेल्या आहेत, त्यांचे पुनर्वसन कसे करणार? हा एक मोठा 'यक्षप्रश्न' आहे.अशा प्रकारचे नुकसान महाराष्ट्रात यापूर्वी कधीही झाले नव्हते. त्यामुळे फक्त सर्वेक्षण करून थांबणे उपयोगाचे नाही, तर प्रत्यक्ष आर्थिक आणि भौतिक मदतीची गरज आहे.शरद पवार म्हणाले की, अतिवृष्टीमुळे पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, या संकटात शेतकऱ्यांना त्वरित मदत आणि भरपाईची गरज आहे. मात्र, केवळ नुकसान भरपाई देऊन प्रश्न सुटणार नाही. ज्यांची उपजीविकेचे साधन असलेली जमीनच राहिली नाही, त्या शेतकऱ्यांसाठी सरकारने धोरणात्मक निर्णय घेऊन त्यांच्या पुनर्वसनाची सोय केली पाहिजे. सरकारने याकडे गांभीर्याने पाहून लवकरात लवकर मदत जाहीर करावी.



## वैजाली येथे विठ्ठल-रूखमाई मंदिराचे भूमिपूजन आमदार डॉ.विजयकुमार गावित यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**बोरद । मंगेश पाटील**



विजयादशमीच्या शुभमुहूर्तावर शहादा तालुक्यातील वैजाली येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज भगवा चौकात विठ्ठल-रूखमाई मातेच्या मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या भूमिपूजन सोहळ्याचे उद्घाटन राज्याचे माजी मंत्री व आमदार डॉ. विजयकुमार गावित यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यानंतर माजी सैनिक लोटन पाटील व त्यांच्या पत्नी सौ. रेखाबाई पाटील, तसेच भागवताचार्य ह.भ.प. हर्षल महाराज कुलकर्णी खरवडकर यांच्या हस्ते विधिवत पूजा पार पडली.

कार्यक्रमास जिल्हा परिषदेच्या माजी बांधकाम सभापती सौ. हेमलता शितोळे, उद्योजक शशिकांत पाटील, सरपंच सुरेखा ठाकरे, माजी सरपंच बन्सीलाल मोरे, भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती वीर सिंग ठाकरे, तसेच विविध मान्यवर, ग्रामस्थ, महिला व तरुण वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. विजयकुमार गावित म्हणाले की, मंदिर उभारणीमुळे गावात सामाजिक व धार्मिक ऐक्य वृद्धिंगत होते. यामुळे नव्या पिढीला प्रेरणा मिळते आणि समाजोपयोगी कार्यांना चालना मिळते. मंदिर उभारणीसाठी सर्वांनी एकजुटीने सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच गावातील विकासकामांसाठी आवश्यक निधी स्थानिक विकास निधीतून उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन पत्रकार संजय पाटील यांनी केले. हरिपाठ भजनी मंडळ व ग्रामस्थांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रम अत्यंत उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाला.

## जैवविविधतेचे संवर्धन व संरक्षण ही काळाची गरज-रणजित राऊत

**दैनिक वादळ वार्ता**
**पाटोदा । प्रतिनिधी**

राष्ट्रीय वन्यजीव सप्ताहानिमित्त पद्मभूषण वसंतदादा पाटील महाविद्यालय, पाटोदा येथील प्राणीशास्त्र विभाग आणि चंपारण्य ग्रीन क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात युवा शास्त्रज्ञ, वन्यजीव छायाचित्रकार व जैवविविधता संशोधक रणजित राऊत यांनी जैवविविधतेचे संवर्धन व संरक्षण ही काळाची गरज आणि वन्यजीव शास्त्रातील रोजगाराच्या संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



आपल्या व्याख्यानात राऊत यांनी निसर्गातील प्रत्येक जीव हा पर्यावरणीय साखळीचा महत्त्वाचा घटक असल्याचे सांगितले. जैवविविधतेचे संवर्धन हे मानवाच्या अस्तित्वाशी निगडित असून त्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. तसेच, वाढत्या पर्यावरणीय आव्हानांच्या पार्श्वभूमीवर वन्यजीव शास्त्र, पर्यावरण विज्ञान, आणि संवर्धन क्षेत्रातील विविध रोजगाराच्या नव्या संधींबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली, तसेच व्याख्यानानंतर विद्यार्थ्यांना वन्यजीवांच्या चित्रफिती दाखविण्यात आल्या.

अध्यक्ष पदावरून बोलत असताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी विद्यार्थ्यांना वन्यजीव व जैवविविधतेबद्दलचे महत्त्व पटवून सांगितले. प्रा. डॉ. प्रेमचंद सिरसट विभागप्रमुख, प्राणीशास्त्र यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करून व्याख्याते प्रा. रणजित राऊत यांचा परिचय करून दिला तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महादेव काळे यांनी केले. या प्रसंगी उपप्राचार्य डॉ.सतिश माऊलगे, प्रा.डॉ.अभय क्षीरसागर पदव्युत्तर संचालक गणेश पचकोरे यांनीही कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.तसेच सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षेकेत्तर कर्मचारी आदि कार्यक्रमास उपस्थित होते.

## बृहन्मुंबई मनपा माध्यमिक शिक्षक संघर्ष संघटनेचे मागण्यासाठी १४ ऑक्टोबर पासून आंदोलन

**दैनिक वादळ वार्ता**

बृहन्मुंबई मनपा माध्यमिक शिक्षक संघर्ष संघटनेतर्फे शिक्षक संवाद व शिक्षक गुणगौरव सोहळा हा भव्य कार्यक्रम दि. ४ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १.०० वाजता मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे शिक्षक आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री राहुल झेंडे (अध्यक्ष, बृहन्मुंबई मनपा माध्यमिक शिक्षक संघर्ष संघटना) होते.व्यासपीठावर सरचिटणीस श्री अशोक साठे, खजिनदार श्री योगेश्वर नाहीरे, उपाध्यक्ष श्रीमती प्राजक्ता माळी, श्री राहुल जगधने,श्री सुनील बुरुकुल, श्री भिकन सोनवणे, श्री इम्रान खान, श्री हमीद रेघीवाले हे मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री स्वप्निल जगताप व श्री संजय आंधळे यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात दिवंगत १४ माध्यमिक शिक्षकांना श्रद्धांजली अर्पण करून झाली. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व सरस्वती देवी यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करण्यात आले. स्वागतगीताचे सादरीकरण श्रीमती पूजा नाहीरे व त्यांच्या टीमने केले. यानंतर संघटनेचे सरचिटणीस श्री अशोक साठे यांनी प्रास्ताविक सादर केले. त्यांनी



बृहन्मुंबई महानगरपालिकेतील DCPS (Defined Contribution Pension Scheme) पासून वंचित राहिलेल्या २००५ नंतर नियुक्त शिक्षकांच्या मूलभूत समस्या, हायकोर्टात दाखल केलेल्या याचिका, प्रशासनातील अपारदर्शकता आणि शिक्षकांच्या हक्कांविषयी सविस्तर माहिती देत प्रलंबित मागण्या मांडल्यात आल्या

१. DCPS/NPS - पूर्वलक्ष्य प्रभावाने लागू व व्याजासह परतावा.

२. अपदवीधर प्रशिक्षक शिक्षक यांना त्यांच्या सेवाज्येष्ठता नुसार व पदवीधर शिक्षक वेतन श्रेणी साठी शैक्षणिक अहर्ताच्या आधारावर नेमणूक.

३. बिंदू नामावली व समायोजन प्रक्रिया पारदर्शकपणे राबविणे.

४. शालार्थ आयडी निर्मिती व वेतन प्रक्रिया सुलभ करणे.

५. वैद्यकीय प्रतिपूर्ती व मृत कर्मचारी कुटुंबांना मृत्यू उपदान सेवा उपदान व कुटुंब निवृत्ती वेतन व सातव्या वेतन आयोगाचे थकीत ध्येय हप्ते देण्यात यावी.

६. प्रभारी मुख्याध्यापकांना पदोन्नती व भत्ता देणे.

महापौर पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षकांचा गुणगौरव सोहळा आमदार श्री ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते पार पडला. यावेळी म्हात्रे आपल्या मार्गदर्शनपर भाषणात म्हणाले जर प्रशासनाने पालिका माध्यमिक शिक्षकांच्या प्रलंबित मागण्या पुढील आठवड्यापर्यंत मान्य न केल्यास मी स्वतः १४ ऑक्टोबर रोजीच्या शिक्षक आंदोलनात सहभागी होऊन नेतृत्व करणार आहे. ऊझड संदर्भातील निवेदन उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे यांना देण्यात आले असून, मी प्रमुख सल्लागार म्हणून शिक्षकांच्या न्याय्य हक्कासाठी ठोस प्रयत्न करीन. दिवंगत शिक्षकांच्या कुटुंबीयांना योग्य तो न्याय मिळवून देण्यासाठी १००% प्रयत्न करेल. या विषयात मनीषा कायंदे मॅडम आणि अभ्यंकर साहेब यांच्यासह अन्य लोकप्रतिनिधींचे सहकार्य घेण्यात येईल. संघटनेचे अध्यक्ष श्री राहुल झेंडे यांनी अध्यक्षीय भाषणात शिक्षकांना संघटनात्मक एकतेचे आवाहन केले. शिक्षकांच्या मूलभूत मागण्यांबाबत प्रशासन व शासनाने ठोस निर्णय घेत नाही. तोपर्यंत संघटना संघर्षाची भूमिका कायम ठेवेल,

## मोबाईल चोरी प्रकरणी कर्जत पोलिसांची धडाकेबाज कारवाई




**दैनिक वादळ वार्ता**

कर्जत पोलीस ठाण्याच्या हद्दीत नागरिकांचे मोबाईल फोन्स तसेच ओटीडीआर मशीन चोरीला गेल्याच्या तक्रारींवर तातडीने आणि काटेकोर तपास करून कर्जत पोलिसांनी एका आरोपीस अटक करण्यात यश मिळवले आहे. या कारवाईमुळे नागरिकांचा पोलिसांवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.ही कारवाई रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक मा. श्रीमती आँचल दलाल, अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे, तसेच कर्जत विभागाचे उप विभागीय पोलीस अधिकारी राहूल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.या प्रकरणी अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव चंद्रकांत माधव अनकाडे (रा. दैठणा, ता. कंधार, जि. नांदेड) असे असून, त्याला दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे. या आरोपीचा गुन्हेगारी पूर्वइतिहास असल्याची माहिती पोलिस तपासात समोर आली आहे.

गुन्हा रजिस्टर क्र. ९८/२०२५, बी.एन.एस. कलम ३०६ प्रमाणे हा गुन्हा दि. ४ मार्च २०२५ रोजी कर्जत पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला होता. नागरिकांकडून गहाळ मोबाईल व अन्य मालमत्ता चोरी झाल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर प्राप्त झाल्यानंतर पोलिसांनी या सर्व प्रकरणांचा सखोल तपास सुरू केला होता. तपासादरम्यान पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फूटेज तपासणी आणि स्थानिक माहितीदारांच्या मदतीने आरोपीचा माग काढला.या संपूर्ण कारवाईत पोलीस निरीक्षक संदीप भोसले, पो.उ.नि. सुशांत वरक, पोहवा स्वप्नील येरुणकर , पोहवा समीर भोईर , पोना प्रविण भालेराव , पोना केशव नागरगोजे आणि पोकॉ विठ्ठल घावस यांनी महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली.

पोलिसांच्या दक्ष आणि तांत्रिक तपासामुळे आरोपीला अटक करून त्याच्याकडून चोरी गेलेल्या मालमत्तेचा मोठा भाग हस्तगत करण्यात आला आहे.

## अहमदनगर जिल्हा मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने ९३ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव

**दैनिक वादळ वार्ता ।**
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अहमदनगर जिल्हा मराठा समाज सेवा मंडळ समाजातील होतकरु व गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठिशी उभे आहे. संस्थेच्या वतीने सातत्याने गुणवंत विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम केले जात आहे. गुणवंत विद्यार्थी समाजाचे भूषण असून, त्यांना दिशा देण्याचे काम केले जात असल्याचे प्रतिपादन संस्थेचे सचिव अनिल शिंदे यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा समाज सेवा मंडळाच्या वतीने सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील इयत्ता दहावी बोर्डाच्या परीक्षेत ९३ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्याप्रसंगी शिंदे बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष बापूसाहेब डोके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमाप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष दादाभाऊ कळमकर, उपाध्यक्ष बाबासाहेब गिरवले, सहसचिव बाळकृष्ण काळे, खजिनदार विनायकराव गरड, विश्वस्त जयंत वाघ, रमाकांत गाडे आदींसह पालक व गुणवंत विद्यार्थी उपस्थित होते.

पुढे बोलताना शिंदे म्हणाले की, मागील चार वर्षापासून सातत्याने मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला जात आहे. पहिल्या वर्षी २ नंतर ३ आणि सध्या ५ हजार रुपये प्रत्येकी गुणवंतांना देण्यात आले आहे. पुढील वर्षापासून प्रत्येक गुणवंत विद्यार्थ्यांना ११ हजार रुपये देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.



प्रारंभी राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे प्रारंभ करण्यात आले. प्रास्ताविकात सहसचिव बाळकृष्ण काळे यांनी समाजाला दिशा व आधार देण्याच्या उद्देशाने १९७५ साली या सेवा मंडळाची स्थापना करण्यात आली आल्याचे स्पष्ट करुन, सुरु असलेल्या सामाजिक कार्याची माहिती दिली. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते ९३ टक्के पेक्षा अधिक गुण मिळवलेल्या ३० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपये, सन्मानपत्र, गुलाबपुष्प व पुस्तक देऊन सन्मान करण्यात आला.बापूसाहेब डोके म्हणाले की, ग्रामीण भागातील मुले-मुली विशेष गुण प्राप्त करून पुढे येत आहे. यामध्ये मुलींची संख्या अधिक आहे. पालक व शिक्षक त्यांना वळण देऊन योग्य मार्ग दाखविण्याचे काम करत आहेत. समाजसेवेसाठी संस्था कटिबद्ध असून त्या दिशेने कार्य सुरु आहे. समाजाची शिक्षणातून प्रगती साधली जाणार आहे. कुणबी प्रमाणपत्राचा पुरेपूर फायदा गुणवंत विद्यार्थ्यांनी घ्यावा. ध्येयनिश्चित करा ते प्राप्त करण्यासाठी सातत्याने वाटचाल करण्याचे व तंत्रज्ञान क्षेत्राकडे वळण्याचे त्यांनी आवाहन केले.पुढील वर्षी गुणवंतांना प्रत्येकी ११ हजार रुपये बक्षीस देण्यासाठी रमाकांत गाडे यांनी १ लाख १ हजार, बापूसाहेब डोके व अनिल शिंदे यांनी प्रत्येकी ५१ हजार रुपये देण्याचे जाहीर केले. आभार जयंत वाघ यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी यशवंत कदम यांनी परिश्रम घेतले.

# पत्रकार संरक्षण कायद्याची त्वरित अंमलबजावणी करा

## मागणीसाठी ११ ऑक्टोबर रोजी पत्रकारांचे एसएमएस पाठवा आंदोलन

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

पत्रकार संरक्षण कायदयाची त्वरित अंमलबजावणी करावी या मागणीसाठी महाराष्ट्रातील पत्रकार २५ नोव्हेंबर रोजी आझाद मैदानावर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करणार आहेत.. या आंदोलनाचा पहिला टप्पा म्हणून येत्या ११ ऑक्टोबर २५ रोजी एसएमएस पाठवा आंदोलन केले जाणार आहे.. या दिवशी महाराष्ट्रातील पत्रकार मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना हजारो एसएमएस पाठवून आपल्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधतील.. सर्व प्रमुख पत्रकार संघटनांनी मिळून स्थापन केलेल्या पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाचा वतीने हे आंदोलन करण्यात येत आहे..

महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायद्याचे विधेयक २०१७ मध्ये संमत झाले.. त्यानंतर नोव्हेंबर २०१९ मध्ये त्यावर राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली. ८ डिसेंबर २०१९ मध्ये भारत सरकारच्या गॅझेटमध्ये कायदा प्रसिध्द झाला .. मात्र त्याच्या अंमलबजावणीबीबतचे नोटिफिकेशन राज्य सरकारने न काढल्याने हा कायदा अंमलात आला नाही.. सरकारने तातडीने नोटिफिकेशन काढावे यासाठी विविध पत्रकार संघटना पाठपुरावा करत असताना देखील कायदा अजून अस्तित्वात आला नाही.. अखेर सर्व संघटनांनी एकत्र येत २५ नोव्हेंबरला लाक्षणिक उपोषण करण्याचा निर्णय घेतला.. ११ ऑक्टोबर चे आंदोलन हे २५ नोव्हेंबरच्या आंदोलनाचा पहिला टप्पा आहे.पत्रकारांना कोणतेही कायदेशीर संरक्षण नसल्याने राज्यात पत्रकारांवरील हल्ले मोठ्या संख्येने वाढले आहेत.. अलिकडच्या काळात नाशिक, मुंबई, अमरावती, करमाळा येथे पत्रकारांवर हल्ले झालेत.. हल्लेखोरांवर जुजबी कारवाई झाल्याने ते मोकाट आहेत.. पत्रकारांना धमक्या देण्याचे प्रमाणही सातत्याने वाढत आहे... हे सर्व वास्तव मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या नजरेस आणून देण्यासाठी, आणि पत्रकारांच्या संतप्त भावना त्यांच्या कानावर घालण्यासाठी एसएमएस पाठवा आंदोलन केले जात आहे.. महाराष्ट्रातून लाखो एस एमएस मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना जातील अशी अपेक्षा आहे. एसएमएस आंदोलनात राज्यातील पत्रकारांनी सहभागी होऊन आपल्या संतप्त भावना मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालाव्यात असे आवाहन पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्यावतीने सहभागी संघटना मराठी पत्रकार परिषद, मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई प्रेस क्लब, मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ, टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन, बृहन्मुंबई यूनियन ऑफ जर्नालिस्ट, बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ, मुंबई क्राइम रिपोर्टर असोसिएशन,पुणे पत्रकार प्रतिष्ठान, पुणे श्रमिक पत्रकार संघ, मुंबई हिंदी पत्रकार संघ, नॅशनल यूनियन जर्नालिस्ट ऑफ इंडिया, महाराष्ट्र श्रमिक पत्रकार संघ, जर्नालिस्ट यूनियन ऑफ महाराष्ट्र, डिजिटल मिडिया परिषद,बीयूजे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांनीकेलेआहे.




# प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांसाठी 'मिशन मोड'वर कार्यवाही: सरदार सरोवर बाधितांच्या समस्या निवारणासाठी 'ट्रॅकर सिस्टिम'

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

सरदार सरोवर प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित प्रश्नांवर जलदगतीने आणि पारदर्शक उपाययोजना करण्यासाठी नंदुरबार जिल्हा प्रशासनाने दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी महत्त्वाचे पाऊल उचलले. जिल्हाधिकारी कार्यालयात डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत बाधितांना न्याय मिळवून देण्यासाठी 'ट्रॅकर सिस्टिम' सह ठोस निर्णयांवर शिक्कामोर्तब करण्यात आले.




बैठकीत घोषित प्रकल्पग्रस्तांना त्यांच्या पसंतीनुसार जमीन आणि निवासी भूखंडाचे वाटप लवकरात लवकर पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांनी या संवेदनशील कामासाठी दरमहा कामकाजाचे स्पष्ट वेळापत्रक निश्चित करून सर्व संबंधित विभागांना कार्यवाहीचे आदेश दिले. जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी स्पष्ट केले की, प्रकल्पग्रस्तांच्या हक्कांचे संरक्षण ही प्रशासनाची प्राथमिकता आहे. प्रत्येक प्रलंबित प्रकरणाचे वेळबद्ध निराकरण करून लाभार्थ्यांना न्याय मिळवून देणे हे आमचे वचन आहे. प्रशासनाने आता जमीन खरेदी प्रकरणांसाठी एक विशेष 'ट्रॅकर सिस्टिम' सुरू केली आहे. या सिस्टिममुळे प्रत्येक प्रकरणाची पारदर्शक व वेळबद्ध प्रगती सुनिश्चित केली जाईल आणि प्रकरणांच्या स्थितीत कोणताही संभ्रम राहणार नाही. तसेच, तहसील स्तरावर प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित अहवालांना होणारा विलंब टाळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ ते अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसन प्रक्रियेत उत्तरदायित्व आणि संवेदनशीलता जपण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे या निर्णयांनी दाखवून दिले आहे. या महत्त्वपूर्ण बैठकीस सहाय्यक जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी (नंदुरबार, तळोदा, शहादा), विविध तालुक्यांचे तहसीलदार, भूमी अभिलेख उपअधीक्षक, नर्मदा विकास विभागाचे अधिकारी, तसेच नर्मदा बचाव आंदोलनाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यामुळे प्रशासकीय यंत्रणा आणि बाधितांचे प्रतिनिधी यांच्यात थेट समन्वय साधला गेला. प्रशासनाच्या पारदर्शकता, संवेदनशीलता आणि उत्तरदायित्वाच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. या कार्यवाहीमुळे प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाला गती मिळेल आणि त्यांना लवकरच न्याय मिळेल, अशी आशा आहे.

# न.प.,न.पं.निवडणुक सदस्यपदाची ८ ऑक्टोबरला आरक्षण सोडत

### नागरिकांनी उपस्थित राहण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**लातूर । नदीम पटेल**

जिल्ह्यातील उदगीर, अहमदपूर, निलंगा, औसा नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायतीच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्य पदाची आरक्षण सोडत बुधवार, ८ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या आरक्षण सोडतीला नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.



उदगीर नगरपरिषद सदस्य पदाची आरक्षण सोडत उदगीर नगरपरिषद सभागृहात, अहमदपूर नगरपरिषद सदस्य पदाची आरक्षण सोडत अहमदपूर पंचायत समिती सभागृहात, निलंगा नगरपरिषद सदस्य पदाची आरक्षण सोडत निलंगा उपविभागीय अधिकारी कार्यालयात, औसा नगरपरिषद सदस्य पदाची आरक्षण सोडत औसा तहसील कार्यालय परिसरातील प्रशासकीय इमारतीच्या सभागृहात आणि रेणापूर नगरपंचायत सदस्य पदाची आरक्षण सोडतरेणापूर तहसील कार्यालय येते होणार आहे. उदगीर, अहमदपूर, निलंगा आणि औसा येथील आरक्षण सोडतीसाठी संबंधित उपविभागाचे उपविभागीय अधिकारी यांना, तर रेणापूर येथील सोडतीसाठी पुनर्वसन उपजिल्हाधिकारी यांना प्राधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

# केजमध्ये स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाची जुगारा विरुद्ध कारवाई

### १२ जुगारी ताब्यात घेऊन ६ लाख ३५ हजाराचा मुद्देमाल जप्त

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । गौतम बचुटे**

केज शहरात मुख्य रस्त्या लगत पत्र्याच्या शेडमध्ये चालत असलेल्या जुगार अड्यावर केज पोलिसांच्या गुन्हे अन्वेषण पथकाने छापा मारून तिर्रट खेळणाऱ्या १२ जणांना पकडले. त्यांच्या कडील जुगाराचे साहित्य, नगदी १७ हजार ३५० रुपये, एक लाख ७३ हजार रुपयांचे आठ मोबाईल व चार लाख ४५ हजार रुपयांच्या सहा दुचाकी असा ६ लाख ३५ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

केज शहरात मुख्य रस्त्यावर जिरायत खात्याच्या जागेवर पत्र्याच्या शेडमध्ये काही जण तिर्रट नावाचा जुगार पैशावर खेळत असल्याची गुप्त माहिती मिळताच केज ठाण्याचे पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे, स्थानिक गुन्हे अन्वेषण पथकाचे पोलिस उपनिरिक्षक अमिरोद्दीन इनामदार, जमादार बाळासाहेब अहंकारे, पोलीस नाईक पुरुषोत्तम शेप, प्रकाश मुंडे, शिवाजी कागदे यांच्या पथकाने सोमवार दि. ६ ऑक्टोबर रोजी रात्री ७.३० वाजता छापा मारला. यावेळी अनिल कमलाकर काळे, सुरेश बाळू काळे, नेहाल अशोक कांबळे ( तिघे रा. क्रांतीनगर, केज), शंकर अंकुश पवार



(रा. वडारवस्ती ता. केज), बाळु अर्जुन गाढवे (रा. अहिल्यादेवी नगर, केज), अशोक बाळासाहेब शिंदे (रा. विठ्ठलनगर, केज), सचिन कविदास पवार, कृष्णा शहाजी कोठुळे (दोघे रा. बोबडेवाडी ता. केज), दिलीप फुलचंद पवार (रा. चिंचपुर ता. धारुर), मनोज अण्णासाहेब मस्के (रा. फुलेनगर,केज), मयुर भिमराव गायकवाड (रा. शिक्षक कॉलनी, केज) या १२ जणांना तिर्रट खेळताना रंगेहाथ पकडले. त्यांच्या कडील जुगाराचे साहित्य, नगदी १७ हजार ३५० रुपये, एक लाख ७३ हजार रुपयांचे आठ मोबाईल व चार लाख ४५ हजार रुपयांच्या सहा दुचाकी असा ६ लाख ३५ हजार ३५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. फौजदार अमिरोद्दीन इनामदार यांच्या फिर्यादीवरून वरील बारा जणां विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गु. र. नं. ५५०/२०२५, भारतीय जुगार कायद्याचे कलम १२(ए) नुसार गुन्हा दाखल झाला आहे. तपास जमादार दत्तात्रय बिक्कड हे करीत आहेत.

# कोजागिरी पौर्णिमा संगम येथे भजन गाऊन उत्साहात साजरी

**दैनिक वादळ वार्ता**
**परळी । प्रतिनिधी**



आश्विन महिन्यातील पौर्णिमेला कोजागिरी पौर्णिमा ही कोजागरी साजरी करण्यात आली. ही पौर्णिमा हिंदू धर्मात विशेष महत्त्वाची मानली जाते आणि तिच्या निमित्ताने विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन संगम येथे कोकाटे महाराज परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.

कोजागिरी पौर्णिमेचे महत्त्व यावेळी जनाई महाराज कोकाटे यांनी सांगितले

कोजागिरी पौर्णिमेला लक्ष्मी पौर्णिमा असेही म्हटले जाते. या दिवशी देवी लक्ष्मी पृथ्वीवर अवतरते आणि को जागर्ति (कोण जागा आहे) असे विचारते, म्हणूनच या पौर्णिमेला कोजागिरी पौर्णिमा म्हणतात. या दिवशी देवी लक्ष्मीची पूजा केली जाते आणि तिचा आशीर्वाद मिळवण्यासाठी विविध धार्मिक विधी केले जाते भजन गाऊन दूध तापविले जाते चंद्राचे किरण यामध्ये दुधामध्ये पाहाण्याचे महत्त्व आहे असं कोजागिरी पौर्णिमा चे उत्सवाचे स्वरूप आहे लक्ष्मी पूजा घरांमध्ये आणि मंदिरांमध्ये देवी लक्ष्मीची पूजा करण्यात आली. दुग्ध पौर्णिमा काही ठिकाणी दुग्ध पौर्णिमा म्हणूनही हा दिवस साजरा केला जातो, जेथे दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व असते.

- सांस्कृतिक कार्यक्रम: विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम, अभंग गवळण भावगीत भक्ती गीत भजन, आणि इतर धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या ठिकाणी जनाई महाराज कोकाटे यांच्या मधुर आवाजातून सर्वांना मार्गदर्शन भेटले अभंग गाऊन मंत्रमुग्ध केले सुरेश मोरे सर बब्रुवाजी गिराम आनंदी कोकाटे यांनी सुंदर मृदंग वाजविला श्रावणी कोकाटे यांनी गोड असं गायन केलं अंकिता चव्हाण यांनी सुंदर गवळणी सादरीकरण केल्या यावेळी सर्व गावातील भजनी मंडळ उपस्थित होते.कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा यावेळी रामेश्वर महाराज कोकाटे अध्यक्ष अखिल भारतीय वारकरी मंडळ यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या

या दिवशी केलेली पूजा आणि उपवास धनधान्य आणि सुखसमृद्धी प्रदान करतात.विशेष उपक्रम मंदिरांमध्ये विशेष पूजा मंदिरांमध्ये आणि अभिषेकाचे आयोजन करण्यात आले होते घरी लक्ष्मी पूजालोकांनी आपापल्या घरी देवी लक्ष्मीची पूजा केली आणि आरत्या केल्या बरोबर बारा वाजता भैरवी या रागाने सांगता करण्यात आली आणि सर्वांनी दूध ताकविलेले सर्व मसालेदार पदार्थ टाकून गोड असं दूध सर्वांनी प्राशन केले या दुधाचा आनंद सर्वांनी घेतला सर्वांचे आभार रामेश्वर महाराज कोकाटे यांनी मांडल.

# तळोद्यात शतकाची परंपरा जपत खंडोजी महाराज संस्थान रथ ट्रस्ट चा १३० वा रथोत्सव उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

तळोदा शहरात शतकाहून अधिक काळाची परंपरा जपत, खंडोजी महाराज संस्थानचा १३० वा रथोत्सव कोजागिरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या ऐतिहासिक रथयात्रेमुळे शहराला जणू यात्रेचे स्वरूप आले होते.

हा रथोत्सव केवळ एक धार्मिक विधी नसून, त्याला तब्बल १३० वर्षांची थोर परंपरा आहे. तळोद्यापासून तीन किलोमीटरवरील आमलाड येथे कार्यक्षेत्र असलेल्या संत खंडोजी महाराज हे विठ्ठलाचे निस्सीम भक्त होते. त्यांचे शिष्य विठ्ठल स्वामी (जे कर्नाटक राज्यातील कोंडकानीचे होते) यांनी आपल्या गुरूंच्या स्मरणार्थ, त्यांच्या पुण्यतिथीला भगवान विष्णू रुपात खंडोजी महाराजांच्या रथयात्रेची सुरुवात केली. दरवर्षी कोजागिरी पौर्णिमेला श्री विष्णू रुपातील संत खंडोजी महाराज व शिष्य विठ्ठल स्वामी यांच्या प्रतिमा व पादुकांची रथयात्रा काढली जाते. रथोत्सवाचे मुख्य आकर्षण म्हणजे ३१ फूट उंचीचा भव्य रथ. हा रथ अतिप्राचीन असून उत्कृष्ट लाकडी शिल्पकलेचा नमुना आहे. या रथाला दोन घोडे व सारथी म्हणून अर्जुन आहे. रथावर गणपती, ब्रह्मा, दत्त, अंबा माता, लक्ष्मीनारायण, विठ्ठल-रुख्मिणीसह विविध देवतांच्या लाकडी प्रतिकृती आहेत. रथोत्सवाच्या दिवशी रथात भगवान विष्णूच्या २४ अवतारांच्या प्रतिकृतींसह मध्यभागी श्रीकृष्णाची मूर्ती, तसेच संत खंडोजी महाराज आणि विठ्ठल स्वामींची प्रतिमा व पादुका ठेवून जल्लोषात रथयात्रा काढली जाते. माजी नगराध्यक्ष अजय परदेशी यांच्या हस्ते पूजन करून रथोत्सवाला सुरुवात झाली. रथावरील विविध देवतांची स्थापना स्थानिक उपाध्यांनी केली. रथ आधी दोरखंडाने ओढला जात असे, आता भाविकांच्या सुरक्षिततेसाठी ट्रॅक्टर लावून रथ ओढला जातो. भाविक भगवान बालाजी व खंडोजी महाराज यांचा जयघोष करत बालाजींना केळीचा प्रसाद अर्पण करतात आणि रथावरील पुरोहित तोच प्रसाद भाविकांना वाटतात. खान्देशातील परंपरेनुसार, गणेशोत्सवानंतर स्थापन केलेल्या गुलाबाई देवीला (भुलाबाई) विसर्जन करण्याआधी महिला व मुली रथातील विष्णूदेवाच्या दर्शनासाठी घेऊन येतात. यावेळी तळोदा पोस्टे चे पो नि राजेन्द्र लोखंडे, भाजपचे जितेंद्र सूर्यवंशी, योगेश चौधरी, कैलास चौधरी, गौरव वाणी, सुभाष चौधरी, शिरीष माळी, नारायण ठाकरे, दीपक कलाल, शिंदे सेनेचे हितेंद्र क्षत्रिय, संदीप परदेशी आदी उपस्थित होते. रथ ट्रस्टचे विश्वस्त नरेंद्र ओझा, राजाभाई वाणी, संतोष वाणी, रोहित कापडिया, मनीष सुगंधी, डव्होकेट संजय पुराणिक, वाल्मिक तांबोळी, विजय तांबोळी, मधु सुतार यांनी परिश्रम घेतले.रथाचे पौरोहित्य सुनील दीक्षित, प्रसाद बैकर, हरिश्चंद्र जोशी, महेंद्र व्यास, किरण जोशी, पियुष जोशी, चैतन्य बैकर यांनी भूषविले. अरुण पिंपरे यांनी ट्रॅक्टर उपलब्ध केले. पोलीस निरीक्षक भदाणे व पोलिसांनी चोख सुरक्षा व्यवस्था ठेवली होती, तर वीज वितरण कर्मचाऱ्यांनी रथयात्रा सुरळीत पार पाडण्यास मदत केली.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077